जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
२१.०९.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: ३४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

## थोडक्यात

### गणेश विसर्जनासाठी बीएमसी सज्ज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी मुंबई महापालिकेने यंदा ३८३ हून अधिक कृत्रिम तलावांची व्यवस्था केली असून, ६७ नैसर्गिक विसर्जन स्थळांवरही आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन सोहळा पार पडावा यासाठी तब्बल २५ हजारांहून अधिक अधिकारी-कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. दरम्यान, सहा फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करण्याचे आवाहन पालिकेने केले आहे. यंदा १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात झाली असून, विसर्जनासाठी पालिका प्रशासनाने व्यापक तयारी केली आहे.

# आयआयटी बॉम्बेत साहिल प्रकरणी डीन निलंबित

### 'त्या' निवेदनावरून संस्थेची माफी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – आयआयटी बॉम्बेतील २२ वर्षीय बीटेक विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या आत्महत्येप्रकरणी संस्थेने मोठी कारवाई केली आहे. विद्यार्थी व्यवहार अधिष्ठाता (डीन) प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांचे तत्काळ निलंबित करण्यात आले असून, साहिलच्या मृत्यूबाबत चौकशी सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, साहिलच्या मृत्यूबाबत यापूर्वी जारी केलेल्या निवेदनाबद्दल आयआयटी बॉम्बेने माफी मागितली आहे.

साहिलच्या मृत्यूनंतर विद्यार्थ्यांचे आंदोलन साहिल वाकोडे हा एनर्जी सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागात द्वितीय वर्षात शिकत होता. शुक्रवारी, १८ सप्टेंबर रोजी पवई येथील आयआयटी बॉम्बेच्या वसतिगृह क्रमांक ४ मधील खोलीत तो मृतावस्थेत आढळला. तो मूळचा यवतमाळ जिल्ह्यातील रहिवासी होता.

मृत्यूपूर्वी काही तास आधी तो परीक्षा देत होता. परीक्षेदरम्यान त्याच्याकडे मोबाईल आढळल्याचे आणि त्याने प्रश्नपत्रिका चॅटजीपीटीवर अपलोड करून उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्याचे आयआयटी बॉम्बेने म्हटले आहे. मात्र, साहिलविरोधात कोणतीही शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात आली नव्हती, असे संस्थेने स्पष्ट केले होते. त्याचे समुपदेशन करण्यात आले असून, या घटनेचा त्याच्या शैक्षणिक कारकिर्दीवर परिणाम होणार नाही, असेही त्याला सांगण्यात आल्याचा संस्थेचा दावा आहे. दरम्यान, साहिलच्या मृत्यूनंतर आयआयटी बॉम्बेच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले.

संस्थेने या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह मानसिक आरोग्याच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना कराव्यात, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. विद्यार्थ्यांनी संस्थेसमोर १८ मागण्यांचे निवेदनही मांडले होते.

प्रा. दुल्ला यांच्यावर आरोप साहिलच्या कुटुंबीयांनी प्रा. सूर्यनारायण दुल्ला यांच्यासह संस्थेतील इतर अधिकाऱ्यांविरोधात पोलिसांत तक्रार केली आहे.

साहिलला मागील काही काळापासून त्रास देण्यात आल्याचा तसेच त्याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. कुटुंबीयांनी जातीय भेदभाव आणि कथित अपमानास्पद वक्तव्यांचेही आरोप केले असून, या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आल्याचे वृत्त आहे. मात्र, या आरोपांची अद्याप चौकशी सुरू असून त्यावर अंतिम निष्कर्ष आलेला नाही. आयआयटी बॉम्बेनेही तपास पूर्ण होण्यापूर्वी घटनेपूर्वीच्या परिस्थितीबाबत निष्कर्ष काढणे अयोग्य असल्याचे म्हटले आहे.

### कोस्टल रोडवर इचथ कारचा थरकाप उडवणारा अपघात

# शरीरातून प्राण गेला तरी शनयचा पाय ॲक्सिलरेटरवरच राहिला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – १००चा स्पीड, कार ५० फुटावरुन खाली पडली, एअरबॅग्ज धडाधड उघडल्या. कोस्टल रोडवर नेमकं काय घडलं? मुंबईतील कोस्टल रोडवर रविवारी पहाटे एक भीषण अपघात झाला होता. या अपघातामध्ये तिघांचा मृत्यू झाला होता. हा अपघात घडला तेव्हा बीएमडब्ल्यू कारचा वेग १०० च्या वर वर होता. त्यामुळे ही कार कोस्टल रोडच्या पुलाला जोरात धडकली आणि रेलिंग तोडून तब्बल ७५ फूट खाली आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, त्यामध्ये गाडीचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. या अपघातात शनय गजर (वय २१), आदित्य जकासनिया (वय १९), धैर्य सेठ (वय १७) या तिघांचा मृत्यू झाला. तर आदित्य ओसवाल हा गंभीर जखमी झाला आहे.

हा अपघात घडला तेव्हा या तरुणांनी मद्यपान केले होते का, याचा तपास पोलीस करत आहेत. अपघातातील मृतांचे रक्ताचे नमुने घेण्यात आले असून ते कलिना येथील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

मृतांचे शवविच्छेदन नायर रुग्णालयात करण्यात आले. या अहवालातून काय समोर येणार, याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# हरित लवादाचे मोदी सरकारकडून खच्चीकरण

### काँग्रेसचा आरोप, उद्योगांच्या बाजूने निकाल होत असल्याची तक्रार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाला मोदी सरकारने गेल्या दशकभरात 'कमकुवत' केले असल्याचा आरोप काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी रविवारी केला. यंदाच्या पहिल्या सहा महिन्यांत गुण-दोषांच्या आधारे सुनावणी झालेल्या एकाही अपीलमध्ये पर्यावरणाच्या किंवा जनहिताच्या बाजूने एनजीटीने निर्णय दिला नसल्याचे एका अभ्यासातून समोर आल्याचा दावा त्यांनी केला. माजी केंद्रीय पर्यावरणमंत्री रमेश यांनी म्हटले की, २ जून २०१० रोजी अस्तित्वात आलेल्या एनजीटी कायद्याचा उद्देश आणि त्यामागील भावना न्यायाधिकरणाने पुन्हा आत्मसात करणे गरजेचे आहे. 'साऊथ एशियन रिपोर्टर फॉर एन्व्हायर्नमेंट लॉज' ने १९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रकाशित केलेल्या अभ्यासाचा हवाला देताना रमेश म्हणाले की, जानेवारी ते जून २०२६ या कालावधीत एनजीटीच्या पाच खंडपीठांसमोर एकूण ११९ अपिले दाखल झाली. त्यापैकी ५२ अपिले प्रक्रियात्मक कारणांवर फेटाळण्यात आली.

उर्वरित ६७ अपिलांची गुण-दोषांच्या आधारे सुनावणी झाली. त्यापैकी ५१ अपिले उद्योग, प्रकल्प प्रवर्तक किंवा मालमत्ता मालकांनी दाखल केली होती. यातील ३० प्रकरणांत त्यांना अनुकूल आदेश मिळाले, म्हणजेच जवळपास ६० टक्के अपिलांमध्ये त्यांना यश मिळाले. दुसरीकडे, पर्यावरण किंवा जनहिताच्या बाजूने पर्यावरणीय न्यायासाठी दाखल करण्यात आलेल्या १६ अपिलांपैकी एकाही प्रकरणात अनुकूल निर्णय मिळाला नाही, असा दावा रमेश यांनी केला.

# भाजप गटनेते प्रवीण दरेकरांच्या ताफ्यातील कारचा अपघात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मुंबई** – भाजप नेते तथा आमदार प्रविण दरेकर यांच्या ताफ्यातील गाडीचा अपघात झाल्याची माहिती आहे. या अपघातानंतरचे काही फोटो आणि व्हिडिओ देखील समोर आले आहेत.

भाजपचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या ताफ्यातील एका कारला मुंबईतील फ्रीवेवर सोमवारी अपघात झाला. दरेकर यांचा ताफा फ्रीवेवरून जात असताना ताफ्यातील कार आणि टॅक्सीची धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे किरकोळ नुकसान झाले असून दरेकर सुखरूप असल्याची माहिती आहे. अपघाताची माहिती मिळताच दरेकर यांनी स्वतः वाहनातून खाली उतरून घटनास्थळी पाहणी केली. त्यांच्यासोबत खासगी सुरक्षा कर्मचारीही होते.

अपघाताची तीव्रता कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, गणेशोत्सवामुळे मुंबईतील रस्त्यांवर सध्या मोठी वदर्ळ आहे. विविध गणेश मंडळांना भेटी देण्यासाठी राजकीय नेत्यांचीही ये-जा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर दरेकर यांचा ताफा फ्रीवेवरून जात असताना हा अपघात झाला.

अपघातानंतर काही काळ घटनास्थळी वाहनांची गर्दी झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात 'कवच ४.०' सुरक्षा ऑडिट चाचणी यशस्वी : रेल्वे सुरक्षेत महत्त्वपूर्ण टप्पा गाठला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**सोलापूर** – मध्य रेल्वेने रेल्वे सुरक्षेच्या आधुनिकी करणात एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

सोलापूर विभागाने मध्य रेल्वेमधील 'कवच ४.०' ची पहिली स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकनकर्ता लेखापरीक्षण चाचणी यशस्वीपणे पार पाडली आहे. ही चाचणी १९ आणि २० सप्टेंबर २०२६ दरम्यान १०४.७ किलोमीटर लांबीच्या कुर्डुवाडी-बोरिबियाल मार्गावर घेण्यात आली. 'कवच ४.०' ऑडिटची ठळक वैशिष्ट्ये इटलीच्या पथकाकडून पडताळणी: इटलीमधील स्वतंत्र सुरक्षा मूल्यांकन पथकाने प्रत्यक्ष कार्यस्थितीत अनेक महत्त्वपूर्ण सुरक्षा परिस्थितींची कठोर पडताळणी केली. प्रमुख चाचण्या: या चाचण्यांमध्ये 'सिग्नल पासिंग अॅट डेंजर' प्रतिबंध, 'पर्मनंट स्पीड रिस्ट्रिक्शन' द्वारे वेग नियंत्रण, लूप-लाइन वेग नियंत्रण आणि उतारावर घरंगळण्यापासून संरक्षण मिळवण्याच्या क्षमतेची चाचणी घेण्यात आली.



# सोलापुरात दुष्काळामुळे गुरांचा चाराप्रश्न गंभीर

## एक टन चाऱ्याचा दर ६ हजार रुपये

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – यंदा पावसाने पाठ फिरवल्याने सोलापूर जिल्ह्याला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस न पडल्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. एक टन चाऱ्यासाठी ६ हजार रुपये मोजावे लागत असल्याने शेतकरी चिंतेत पडले आहेत. आता जनावरे विकण्याशिवाय पर्याय राहणार नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.



पाऊन नसल्याने शेतातील पिके करपून गेली असताना दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. कारण पावसाअभावी चारा खरेदी करावी लागत आहे. यासाठी एक टनामागे ६ हजार रुपये मोजावे लागत आहेत. ज्या ठिकाणी थोडेफार पाणी आहे, तेथे शेतकरी मक्याचे पीक घेत आहेत. हे मकवान सहा हजार रुपये टन अशा दराने विकले जाऊ लागले आहे. सध्याच्या परिस्थितीत हाही चारा थोडासा असल्याने याचे भाव अजूनही वाढत जाणार आहेत.

# युपीआय वरील 'एमडीआर'चा निर्णय शासनाने पुनर्विचारासाठी खुला ठेवावा : महाराष्ट्र चेंबरचे आग्रही आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – डिजिटल व्यवहारांना चालना देतानाच उद्योजक आणि व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकला जाऊ नये, यासाठी केंद्र शासनाने युपीआय व्यवहारांवरील एमडीआर आकारणीच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी आग्रही मागणी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड







ॲग्रीकल्चरने केली आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रविंद्र माणगावे म्हणाले की, व्यवहारांवर एमडीआर लागू झाल्यास कमी नफ्यावर काम करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या आर्थिक गणितावर प्रतिकूल परिणाम होईल.

किरकोळ व्यापार, सेवा क्षेत्रासाठी अतिरिक्त खर्च व्यवसाय चालवणे कठीण करणारा ठरू शकतो.

## न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट मध्ये

# 'हिंदी दिवस' उत्साहात साजरा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट मध्ये 'हिंदी दिवस' अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

नवीन पिढीला हिंदी भाषेचे महत्व कळावे आणि तिच्याविषयी आदर निर्माण व्हावा. या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, विभाग प्रमुख किशोर देशमुख व पराग भोंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलाने आणि सरस्वती वंदनेने झाली.

हिंदी दिनाचे औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यामध्ये इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांनी हिंदीतील दोहे तर इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर आणि प्रेरणादायी हिंदी कविता सादर करुन सर्वांची मने जिंकली तसेच इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर गाणी तर इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी मनाला मोहून टाकणाऱ्या नृत्याचे सादरीकरणात केले तसेच वर्गामध्ये सुद्धा विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार शालिनी खंडेलवाल यांनी मानले.

याप्रसंगी संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर या सर्वांनी हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय लोणी येथे तालुका कबड्डी खेळ स्पर्धांचे यशस्वी आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – युवक क्रीडा संचालनालय पुणे तसेच जिल्हा क्रीडा अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय लोणी येथे १६ आणि १७ सप्टेबर दरम्यान तालुका कबड्डी खेळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुका शारीरिक शिक्षण विषय समिती माजी उपाध्यक्ष निवृत्त क्रीडा शिक्षक सुनिल पोटदुखे यांच्या अध्यक्षतेखाली या सामन्याचे उदघाटन करण्यात आले. यावेळी



उपस्थित सर्व संघासोबत आलेल्या शिक्षक आणि पंच म्हणुन काम करणारे सर्व उपस्थितांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तालुक्यातील बहुसंख्य शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे संघ या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. १४ आणि १७ वर्षे



वयोगटामध्ये श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालय लोणीच्या विद्यार्थ्यांच्या संघाने तर न्यू इंग्लिश हायस्कूल वरुडच्या विद्यार्थीनींच्या संघाने विजय संपादन केला.

१९ वर्ष वयोगटामध्ये महात्मा फुले ज्युनिअर कॉलेज च्या विद्यार्थ्यांच्या संघाने तर न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलचा विद्यार्थीनींचा संघ विजयी ठरला. हे सर्व सामने बाद पद्धतीने खेळवले गेले. आयोजकांच्या वतीने प्रत्येक बाद झालेल्या संघातील आणि विजयी ठरलेल्या संघातील उत्कृष्ट खेळाडूस मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धा यशस्विरित्या पार पाडण्यामध्ये शारीरिक शिक्षक संजय बोहरपी, सर्व सहकारी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थ्यांनी महत्त्वाची भुमिका साकारली.

या दोन्ही दिवसात शाळेत उपस्थित राहून सर्व सामन्या दरम्यान महत्त्वाची भूमिका पार पाडल्याबद्दल सुनिल पोटदुखे आणि पंच म्हणुन लाभलेले अक्षय धुताले, विकी अंधरेले यांचा मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# दक्षता समितीच्या सदस्यपदी भाग्यश्री बेलसरे यांची वर्णी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हा दक्षता समितीच्या सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली असून मोर्शी मतदार संघातील वरुडच्या भाग्यश्री भाऊराव बेलसरे यांची सदस्यपदी वर्णी लागली आहे.



सदर समितीच्या अध्यक्षपदी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, उपाध्यक्षपदी जिल्हाधिकारी आशिष येरेकर व सचिवपदी जिल्हा पुरवठा अधिकारी राहणार आहे. भाग्यश्री बेलसरे या २०११ पासुन भाजपाच्या महिला कार्यकारिणीतील सक्रीय सदस्या आहे. त्या भाजपाच्या बीएलए समितीच्या सदस्या असून त्या प्रभाग क्र.९ च्या बुथ प्रमुख म्हणुन आपली जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडत आहे. या नियुक्ती बद्दल त्यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी या निवडीचे श्रेय आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांना दिले आहे. वरुड शहरातुन भाग्यश्री बेलसरे यांची जिल्हा दक्षता समितीच्या सदस्यपदी वर्णी लागल्याने वरुडकरांसाठी ही अत्यंत कौतुकाची बाब आहे. त्यामुळे सर्वच स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# सोसायटीच्या कागदपत्रांसाठी ५ रुपये आकारण्यास आक्षेप

## परिपत्रक तात्काळ स्थगित करण्याची मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या कागद पत्रांच्या छायाप्रतींसाठी प्रति पृष्ठ ५ रुपये असा दर निश्चित करणारे सहकार आयुक्तांचे परिपत्रक तात्काळ स्थगित करावे आणि प्रत्यक्ष खर्चावर आधारित सुधारित



दर लागू करावा, अशी मागणी ॲड.धनंजय जुन्नरकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे केली आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी १७सप्टेंबरला जारी केलेल्या परिपत्रकानुसार संस्थेचे उपविधी, लेखापरीक्षित ताळेबंद, नफा–तोटा खाते, समिती सदस्यांची यादी, सभासद नोंदवही, सर्वसाधारण सभा व समिती सभांची कार्यवृत्ते तसेच सदस्यांच्या व्यवहारांशी संबंधित पुस्तके आणि अभिलेख यांच्या प्रतींसाठी प्रति पृष्ठ ५ रुपये आकारण्यात येणार आहेत.

## महात्मा फुले महाविद्यालयातील

# डॉ.चत्रभूज कदम यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचलित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक डॉ.चत्रभूज बाळासाहेब कदम यांना श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांचा स्व.हिरोजी उलेमाले स्मृती कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक पुरस्कार नुकताच श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वार्षिक पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करुन गौरविण्यात आले.





राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ.मनाली क्षीरसागर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख होते तर उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, डॉ.आशिष महल्ले व संपूर्ण कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

त्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयीन पर्यवेक्षिका अलका पवार, रवींद्र वैद्य, निलेश ठाकरे, श्याम मोहड, नंदकुमार मरस्कोल्हे, डॉ.पुरूषोत्तम गेडाम, दीपक चंदनबावणे, प्रवीण नंदेश्वर, अश्विनी हिवसे, भाग्यश्री बुरंगे, भावना देशमुख, प्रतिभा सिडाम, कविता चौधरी, सारिका राऊत उपस्थित होते.

## महात्मा फुले महाविद्यालयामध्ये

# आंतरराष्ट्रीय ओझोन दिनानिमित्त व्याख्यान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे रसायनशास्त्र विभाग व महात्मा फुले माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ओझोन दिनानिमित्त अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उदघाटन प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमासाठी अमरावतीच्या विद्याभारती







महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभाग प्रा.डॉ.प्रवीण बोडखे प्रमुख वक्ते म्हणुन उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थ्यांना ओझोन थराचे महत्त्व, त्याची निर्मिती, ओझोन थराच्या ऱ्हासाची कारणे, पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम आणि ओझोन संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ओझोन थर सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून पृथ्वीवरील सजीवांचे संरक्षण करणारे महत्त्वपूर्ण नैसर्गिक कवच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे समन्वयक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.राजेश गणोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ.अर्चना महाकाळकर, डॉ.युवराज तामगाडगे, डॉ.सुनील कोंडुलकर, डॉ.संजय सातपुते, डॉ.भूपेंद्र रहिले, डॉ.रीना बकाले, डॉ.अतुल वंजारी, प्रा.वैभव गुल्हाने, प्रा.सतीश कोलटेके, डॉ.प्रियंका बेलसरे, प्रा.भाग्यश्री बोरकर, प्रा.ढोके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले तर ओझोन थराच्या संरक्षणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करणे तसेच पर्यावरण संवर्धनाची जाणीव विकसित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे डॉ.राजेश गणोरकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रविंद्र वाघमारे, अशोक बावणे व विश्वास मनोहर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.

### कृत्रिम बुद्धिमत्ता : विद्यार्थी वैचारिकदृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज


आजचे युग माहिती, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वेगवान क्रांतीचे आहे. कालपर्यंत विज्ञानकथांमध्ये दिसणारी कृत्रिम बुद्धिमत्ता आज प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये, संगणकात आणि दैनंदिन जीवनात प्रवेश करून बसली आहे. एका क्लिकवर निबंध लिहिणे, प्रश्नांची उत्तरे मिळवणे, चित्रे तयार करणे, भाषांतर करणे किंवा संगणकीय कोड तयार करणे अशा अनेक गोष्टी काही क्षणांत घडू लागल्या आहेत. या बदलामुळे शिक्षणव्यवस्थेसमोर अभूतपूर्व संधी उभ्या राहिल्या आहेत; परंतु त्याचवेळी विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेपुढे एक गंभीर आव्हानही निर्माण झाले आहे. नवतंत्रज्ञानाचा वापर करताना विद्यार्थी विचारक्षम, नैतिकदृष्ट्या सजग आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार कसा राहील, याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तांत्रिक साधन नसून ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया बदलणारे माध्यम ठरत आहे. पूर्वी एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्याला ग्रंथालयात जावे लागायचे, अनेक पुस्तके चाळावी लागायची आणि स्वतः विचार करून निष्कर्ष काढावा लागायचा. आज मात्र काही सेकंदांत तयार उत्तर मिळते. ही सुविधा नक्कीच उपयुक्त आहे; पण जर विद्यार्थी केवळ तयार उत्तरांवर अवलंबून राहू लागला, तर त्याची चिकित्सक विचारशक्ती, प्रश्न विचारण्याची सवय आणि स्वतंत्र निर्णयक्षमता कमकुवत होण्याची भीती आहे. ज्ञान मिळवण्यापेक्षा विचार करण्याची प्रक्रिया महत्त्वाची असते. ही प्रक्रिया हरवली तर मानवी प्रज्ञाच कृत्रिम होण्याचा धोका आहे. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ माहिती देणे नसतो; तर विचार करणारा, प्रश्न विचारणारा आणि समाजातील समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहणारा नागरिक घडवणे हा असतो. अख विद्यार्थ्याला माहिती देऊ शकते; परंतु मूल्यांची जाणीव, नैतिक निर्णयक्षमता, सहानुभूती आणि मानवी संवेदना शिकवू शकत नाही. एखाद्या प्रश्नाचे उत्तर अख देईल; पण योग्य-अयोग्य याचा विवेक विद्यार्थ्यालाच विकसित करावा लागेल. त्यामुळे अख चा वापर शिकवण्याबरोबरच त्याच्या मर्यादाही विद्यार्थ्यांना समजावून सांगणे आवश्यक आहे. आज जगभरात अख मुळे अनेक क्षेत्रांमध्ये मोठे बदल घडत आहेत. वैद्यकीय निदान, शेती, उद्योग, पत्रकारिता, न्यायव्यवस्था, शिक्षण अशा प्रत्येक क्षेत्रात अख चा प्रभाव वाढत आहे. भविष्यात अनेक रोजगारांचे स्वरूप बदलेल, काही नोकऱ्या नाहीशा होतील आणि नवीन कौशल्यांची गरज निर्माण होईल. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी केवळ तंत्रज्ञान वापरणे पुरेसे नाही; तर सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता, संवादकौशल्य आणि नैतिक निर्णयक्षमता विकसित करणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातील नैतिक प्रश्नही तेवढेच गंभीर आहेत.

# स्त्री स्वातंत्र्य की स्वैराचार!

काळ कोणताही असो समस्या आणि प्रश्न निर्माण होतातच. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये जनतेला भारत देशाला स्वतंत्र मिळविण्याकरिता अनेक थोर नेत्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली व देशाला स्वातंत्र्य मिळाले. प्रत्येक व्यक्ती आत्मनिर्भर व स्वातंत्र्याने जगु लागली. आता समस्या उदभवु लागली आहे की, स्त्रियांची व्यसनाधीनता जोर धरु पहात आहे. आज पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन प्रत्येक क्षेत्रात तिने मोठी प्रगती केली आहे.

आपली भारतीय संस्कृती स्त्रीला प्राधान्य देत आली आहे. पुरातन काळातील स्त्री ही भारतीय संस्कृतीचा आणि इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. वैदिक काळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत स्त्रियांचे समाजातील स्त्रियांचे स्थान आणि त्यांची भूमिका सातत्याने बदलत आहे. वैदिक काळातील स्त्रिया अत्यंत उच्च आणि सन्मानाचे स्थान होते. शिक्षणाचा पूर्ण अधिकार स्त्रियांना होता.

विदुषी स्त्रियांच्या बाबतीत पहावयाचे झाल्यास यज्ञ व धार्मिक विधीमध्ये पतीसोबत पत्नीची उपस्थिती अनिवार्य होती. उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या स्थितीत बदल होऊ लागला. शिक्षणाचे अधिकार पूर्वी इतकी राहिले नाही म्हणुन श्रुती आणि इतर धर्मशास्त्रांच्या काळात स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने घालण्यात आली.




आज २१ व्या शतकात नोकरी अथवा शिक्षणाच्या निमित्ताने स्त्रियांनी उंबरठा ओलांडला असला तरी अजूनही अनेक संकटांना त्यांना सामोरे जावे लागते. पण या परिस्थितीत स्त्री स्वतः जबाबदार आहे असे कधी कधी म्हणावे लागते. हल्ली तिने प्रसारमाध्यमातून केलेल्या प्रदर्शनाचे हे प्रतिसाद असेल असे वाटते. जाहिरातीतून प्रसिद्धीसाठी त्यांचा मादक वावर वाढल्याने त्यांचा वापर करून घेतात. हा त्यांच्या कलेचा नसून शरीराचा वापर करून घेतात. हे विसरायला नको. पुरुष मात्र अंगभर कपडे घालून जाहिरात देतात. स्त्री मात्र आपला शरीराचा संवेदनशील भाग उघडा नागडा करून आज आधुनिकतेच्या नावावर अंग प्रदर्शन करतात. स्त्रीने लज्जा रक्षणासाठी अंगभर कपडे घालावेत. असा जुन्या लोकांचा दंडक होता. पूर्वी सातच्या आत घरात हा नियम होता तीच परिस्थिती उदभवते की काय? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला. आपला मुख्य विषय म्हणजे व्यसनाधीनता आहे परंतु हाही प्रश्न भेडसावत आहे की वस्त्र प्रावरणे स्त्रीने कसे वापरावे. शरीराचे प्रदर्शन करुन आपली अस्मिता धोक्यात आणणे होय. ही समस्या कुठे थांबेल? हा देखील मोठा प्रश्न आ वासून उभा आहे.

आजच्या काळात स्त्रियांच्या जीवनात अनेक बदल झाले आहे. शिक्षण, करिअर, सामाजिक स्थान आणि व्यक्तिमत्व विकास यासारख्या क्षेत्रात महिलांनी प्रगती केली आहे. राहिला प्रश्न स्त्री आता अधोगतीकडे चालली आहे. महिला व्यसनी झाली की संपूर्ण कुटुंबाची वाताहात होते. आधुनिक जीवनशैलीत फॅशन किंवा सोशल ड्रिंक म्हणुन दारु पिण्याची सुरुवात होते. नंतर त्याचे व्यसनात रुपांतर होते. उच्चशिक्षित महिला या व्यसनाधीन झाल्या आहेत त्यांचं अनुकरण सामान्य महिला देखील करत आहेत. स्त्रियांमधील व्यसनाधीनता हे गंभीर आणि वाढणारी समस्या आहे. पूर्वी पुरुषांच्या बाबतीत समाज या समस्येवर चिंताक्रांत अवस्थेत होता. या विषयावर समाज प्रबोधन होत होते. गाडगेबाबांनी आपल्या किर्तनातून व्यसनमुक्तीवर प्रबोधन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सांगितले.

**व्यसने सारी सोडून द्या ना!**
**सरळ पणाने जीवन जगाना!**
**आज अशी स्थिती झाली आहे की**
**जिथे हाती पाळण्याची दोरी!**
**ही जगाते उध्दारी!**

ही उद्धार करणारी स्त्री च जर भरकटली असेल तर या समाजाची उभारणी ज्यावर आहे. ती अवस्था कोलमडल्याशिवाय राहणार नाही आणि या गोष्टीची भयंकर भीती निर्माण झाली आहे.

ज्या स्त्रीच्या ठिकाणी स्वतंत्र विचार करण्याची क्षमता आहे व विचारांती निर्णय घेण्याची क्षमता आहे. कारण तिच्या ठिकाणी क्षमा नावाचा गुण आहे. दुसऱ्यांच्या चुका पदरात घेणारी तिच्या ठिकाणी संयम हा गुण आहे पण आज तिचा संयम सुटू पाहतो आहे. तिचा हा स्वाभाविक गुण लुप्त होऊ पाहत आहे. ती कुटूंबाचा आधार आहे. घरातील मुला बाळांनी जर आईचे अनुकरण केले तर काय होईल? या गोष्टीचा विचार सुज्ञ, शिक्षित, उच्चशिक्षित महिलेने जरुर करावा असे मला वाटते.

आज मुली उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरात जातात. तिथे मुलं मुली एकत्र येऊन दारु, ड्रग्ज, गांजा यांचे सेवन करतात. भान हरपुन वेगवेगळे वर्तन करतात. त्यातून वाद निर्माण होतात. त्याचे पर्याय म्हणुन संयम सुटतो व आत्महत्येसारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात. आज-काल एक नवीन ट्रेंड म्हणुन आला आहे. तो म्हणजे 'लिव्ह इन रिलेशनशिप' हा किळसवाणा प्रकार मुलामुलींमध्ये आला आहे आणि त्यामुळे विवाह संस्था ही धोक्यात आली आहे. यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होत आहे. पालकांच्या पुढे अनेक प्रश्न निर्माण झाले. आता तरुणांपुढे आवाहन आहे की, आपण शिक्षणाकडेच लक्ष देऊन इतर गोष्टी संयमाने आटोक्यात आणाव्यात. मुलं मुली स्त्रिया पालक यांच्यापुढे आव्हान स्विकारण्याची जबाबदारी आहे. या गंभीर समस्यांना सर्वांनी सजग राहण्याची स्थिती निर्माण झाली आहे.



पुष्पा वरखेडकर
वरुड

# नरेंद्र मोदी आणि त्यांनी मुक्त केलेली पिढी

**नरेंद्र मोदी यांनी कधीही भारताच्या युवा वर्गाला ते मतपेढी आहेत, असे मानले नाही. ज्यावेळी विद्यार्थ्यांच्या परीक्षा असतात तेव्हा ते त्यांच्यासोबत बोलतात, मोकळेपणाने चर्चा करतात. ते युवा वर्गासोबत आपणही त्यांच्यातीलच एक आहोत अशा प्रकारे संवाद साधतात.**



दहा वर्षांपूर्वीच्या एका भारतीय तरुण मुलीचे चित्र डोळ्यांसमोर आणा, जी म्हणतेय की तिला रॉकेट बनवायचे आहे. आणि तिला भारतीय अंतराळ संशोधन संस्थेत कामही करायचे नाही, तर स्वतःचे रॉकेट बनवायचे आहे. हे ऐकल्यावर त्या खोलीत शांतता पसरली असती, आणि कोणीतरी सहानुभूतीने तिला समजावले असते की ही, तिच्यासारख्या व्यक्तीने करण्यासारखी गोष्ट नाही. अंतराळ क्षेत्र हे सरकारच्या मालकीचे आहे. इतकी मोठी स्वप्ने पाहण्याचा हक्क फक्त इतर देशांचा आहे.

आता अलिकडेच १८ जुलै २०२६ रोजी, एका खाजगी भारतीय कंपनीने बनवलेले रॉकेट कक्षेत पोहोचले आहे. हे रॉकेट स्कायरुट या कंपनीने बनवले होते. या कंपनीची स्थापना दोन तरुण अभियंत्यांनी केली होती. त्यांनी हेच अशक्य वाटणारे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्या सुरक्षित नोकऱ्या सोडल्या होत्या. त्यांच्या या कामगिरीमुळेच आज भारत अमेरिका आणि चीन या देशांच्या बरोबरीने एखाद्या खाजगी नागरिकाची कंपनी अंतराळात झेप घेऊ शकते, जगातील अशा मोजक्या तीन देशांपैकी भारत एक बनला आहे. दहा वर्षांपूर्वी ज्या मुलीला नाही असे म्हटले गेले होते ती आता म्हणू शकते की तिला एलॉन मस्क व्हायचे आहे. याला एखादा विनोद समजू नका, तर त्याऊलट आता याचा अर्थ खरोखरच तिचा तसा मानस आहे, आणि ती सहज त्या दिशेने सुरुवात करू शकते अशी आजची परिस्थिती आहे.

खरे तर प्रतिभेच्या अनुषंगाने बोलायचे तर या दहा वर्षांत तसे विशेष काहीही बदललेले नाही. भारताकडे प्रतिभा ही कायम होतीच. पण जो बदल घडला आहे, तो उत्तर देण्यात आहे. आपला आजवरचा बहुतांश इतिहास पाहा, भारतात कोणी एखादे मोठे स्वप्न पाहत असेल तर ते पाहणाऱ्याला मिळणारे उत्तर, तुम्ही करू शकत नाही असेच असायचे. अर्थात यामागे तुमच्यात पुरेशी प्रतिभा नाही असे कारणही नव्हते. खरे कारण होते की त्या दिशेने जाण्यासाठीचा दरवाजाच अस्तित्वात नव्हता म्हणून. याच पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचे सर्वांत शांतपणे साध्य केलेले आणि सर्वांत मोठे यश म्हणजे या उत्तरात बदल झाला, आणि 'का नाही' असे झाले.

हा बदल किती खोलवर रुजला आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. कित्येक दशकांपासून, भारतातील महत्त्वाकांक्षा परवानग्यांच्या भिंतीला जाऊन धडकत होत्या. तुम्हाला कितीही महत्त्वाची वाटत असेल अशी कोणतीही गोष्ट करण्यासाठी, तुम्हाला परवाना, मंजुरी, संपर्क किंवा तुमच्या नावामागे योग्य कौटुंबिक ओळख जोडलेली असणे गरजेचे होते. खरे तर या देशात स्वप्न पाहणाऱ्यांची कमतरता कधीच नव्हती. इथे कमतरता होती ती त्या दिशेने घेऊन जाणाऱ्या दारांची. आणि ज्यावेळी अशा दारांची कमतरता असते, त्यावेळी ज्यांच्याकडे आधीपासूनच चाव्या असतात त्यांच्यासाठीच ती आधी उघडली जातात.

अशा परिस्थितीत खरी अंतर्दृष्टी दाखवली ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी. त्यांनी त्या भिंतीकडे पाहिले आणि ती नेमकी काय होती हे ओळखले. त्यांनी अवघ्या एका वाक्यात हा बदल मांडला तो म्हणजे, केंद्र सरकार 'परवानगी नसेल तर बंदी' वरून 'बंदी नसेल तर परवानगी' या दिशेने वाटचाल करत आहे. खरे तर परवानग्यांची भिंत पाडणे आणि त्या जागी खुल्या मुक्त दारांचा देश उभारणे हीच त्यांच्या संपूर्ण दशकभराच्या कारभारामागे ठोस संकल्पना आहे.

सर्वात आधी २०२० मध्ये अंतराळ क्षेत्र खुले गेले. साठ वर्षांच्या सरकारच्या मक्तेदारीनंतर, ज्यांच्याकडे प्रक्षेपण करण्याचे कौशल्य आहे अशा कोणासाठीही हे क्षेत्र खुले झाले आहे. त्या मागोमाग आपल्या शेतांवरील हवाई क्षेत्र खुले झाले. केवळ एका ड्रोन उड्डाणासाठी पूर्वी डझनभर अर्ज आणि परवानग्यांची असण्याची गरज मांडणारी नियमपुस्तिका जवळपास पूर्णपणे फाडून टाकण्यात आली. यामुळे आता छोट्या शहरातील एक किशोरवयीन मुल देखील ड्रोन बनवू शकतो, फोनवर त्याची नोंदणी करू शकतो आणि व्यवसाय सुरू करू शकतो. आता हेच ड्रोन गावागावांमधील हजारो महिलांच्या हाती सोपवण्यात आले आहेत. यातील काही गोष्टी तर फारसा गाजावाजा न करताच घडल्या आहेत, आणि त्या तितक्याच महत्त्वाच्या देखील आहेत. याचेच उदाहरण म्हणजे २०२१ मध्ये, नकाशे खुले केले गेले. यामुळे एखाद्या भारतीय कंपनीला ती आधीपासूनच ज्या देशात अस्तित्वात आहे, त्या देशातच सर्वेक्षण करण्यासाठीच्या मंजुरीची गरजच उरली नाही. अशाच रितीने २०२३ मध्ये, एकाच कायद्याच्या माध्यमातून शेकडो कायद्यांमधील तरतुदीला हात घातला गेला आणि हजारांपेक्षा जास्त फौजदारी स्वरुप-ाच्या दंडात्मक तरतूदी काढून टाकण्यात आल्या.

भारतात २०१४ मध्ये अंतराळ क्षेत्राशी संबंधित जेमतेम एक स्टार्टअप होते, पण आता भारतात सुमारे ४४० अंतराळ स्टार्टअप्स आहेत, त्यासोबतच पूर्वी एकही स्टार्टअप्स नसलेल्या ड्रोन क्षेत्राशी संबंधित शेकडो स्टार्टअप्स आज कार्यरत आहेत. पण खरे तर दारे उघडणे हा कामाचा अर्धाच भाग आहे. तुमच्याकडे तिथपर्यंत पोहोचण्याचा मार्ग नसेल तर दार उघडलेले असण्याचा काही अर्थच उरत नाही. आणि नेमकी याच बाबतीत पंतप्रधानांच्या कल्पनेतील निष्पक्षता आपल्याला ठळकपणे दिसून येते. भारतात २०१६ मध्ये ज्यावेळी स्टार्टअप इंडिया योजनेला सुरूवात झाली, त्यावेळी देशात सुमारे ३५० मान्यताप्राप्त स्टार्टअप्स होते.

आज त्यांची संख्या दोन लाखांहून अधिक झाली आहे आणि त्यांनी वीस लाखांहून अधिक रोजगार निर्माण केले आहेत. तसेच ते आता केवळ बंगळुरू किंवा दिल्लीपुरते मर्यादित न राहता नकाशावरील प्रत्येक कोपऱ्यातील लहान शहरांमध्ये पोहोचले असून यात एक लाखापेक्षा जास्त स्टार्टअप्स महिलांनी सुरू केले आहेत. तसेच, ज्यांचे कधीही बँक खाते नव्हते अशा कोट्यवधी भारतीयांना अखेर मुख्य प्रवाहात आणले गेले, जिथे एक साधा फोनच त्यांची बँक बनला. आज एक भाजी विक्रेता आणि एखाद्या स्टार्टअपचा संस्थापक एकाच पद्धतीने पैसे हस्तांतरित करतात. तरुणांना शिकवण्याच्या पद्धतीचाही पुनर्विचार करण्यात आला आहे. एखाद्या सोळा वर्षांच्या युवा व्यक्तीने करियरसाठी जी शाखा निवडली ती चुकल्यामुळे आयुष्यभर पश्चाताप करावा लागू नये म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरणाने एक अशी व्यवस्था निर्माण केली त्यामध्ये त्या युवा व्यक्तीला विविध विषयांची सरमिसळ करण्याची मुभा मिळाली जी यापूर्वी कधीही नव्हती.

## आजचे राशीभविष्य

**२१ सष्टेंबर २०२६ • सोमवार**

**मेष** Aries
कामात उत्साह वाढेल. वरिष्ठांकडून कौतुक मिळू शकते. आर्थिक व्यवहारात संयम ठेवा.

**वृषभ** Taurus
कुटुंबासोबत आनंदाचे क्षण लाभतील. नवीन योजना यशस्वी होण्याची चिन्हे आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या.

**मिथुन** Gemini
संवादातून महत्त्वाची कामे पूर्ण होतील. प्रवासचा योग आहे. विद्यार्थ्यांना चांगला दिवस.

**कर्क** Cancer
घरातील वातावरण प्रसन राहील. खर्चावर नियंत्रण ठेवा. मन शांत ठेवणे लाभदायक ठरेल.

**सिंह** Leo
नेतृत्वगुणांना वाव मिळेल. व्यवसायात नवीन संधी मिळू शकतात. आत्मविश्वास कायम ठेवा.

**कन्या** Virgo
रखडलेली कामे मार्गी लागतील. नोकरीत सकारात्मक बदल संभवतात. आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ** Libra
नातेसंबंध अधिक दृढ होतील. आर्थिक लाभाची शक्यता आहे. महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्या.

**वृश्चिक** Scorpio
मेहनतीचे फळ मिळेल. अनावश्यक वाद टाळा. कुटुंबीयांचा पाठिंबा लाभेल.

**धनु** Sagittarius
प्रवास आणि नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना यश मिळेल. सकारात्मक विचार ठेवा.

**मकर** Capricorn
कामात जबाबदाऱ्या वाढतील. आर्थिक नियोजन लाभदायक ठरेल. संयमाने निर्णय घ्या.

**कुंभ** Aquarius
मित्रांच्या सहकार्याने कामे पूर्ण होतील. नवीन कल्पनांना प्रोत्साहन मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**मीन** Pisces
आध्यात्मिक विचारांकडे ओढ वाढेल. कौटुंबिक आनंद लाभेल. आर्थिक बाबतीत सावध राहा.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## वरुड तालुक्यातील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – येथील पुरुषोत्तम अकर्ते यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**टेंभुरखेडा** – अनिल सामटकर यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – लिलाधरराव मेंढे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – मिलिंदभाऊ दुर्गे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – महादेवराव क्षिरसागर यांचेकडील महालक्ष्मी दर्शन

# महावितरणच्या अमरावती परिमंडळात जनजागृती व प्रबोधन

## एकाच दिवशी २७ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीवर मार्गदर्शन

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*



**अमरावती** – गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असतानाच, महावितरणच्या अमरावती परिमंडळाने अनोख्या जनजागृती उपक्रमाचे आयोजन केले. १५ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय अभियंता दिना'चे औचित्य साधून परिमंडळातील महावितरणच्या अभियंत्यांनी एकाच दिवशी परिमंडळातील १७९ शाळा / महाविद्यालयात जावून २७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीतीबाबत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. महावितरणतर्फे 'हरित ऊर्जा आणि विद्युत सुरक्षेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम राबवण्यात येत आहे. मुख्य कार्यालयाचे निर्देश आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यातील ८७ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ८९ अशा एकूण १७६ शाळा व महाविद्यालयांमध्ये हा थेट संवाद कार्यक्रम पार पडला. यात एकूण २७ हजार ६३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमादरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वीज अपघातांची कारणे, दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे संबंधित कुटुंबांवर ओढवणारे आर्थिक व सामाजिक संकट याविषयी सविस्तर माहिती दिली. ओल्या हाताने विजेच्या उपकरणांना स्पर्श करणे, चालू कुलरमध्ये पाणी भरणे, तुटलेल्या वीज वाहिन्यांना हात लावणे, आकडे टाकून अनधिकृत वीज वापरणे तसेच कपडे वाळत घालण्यासाठी वीज खांबांना तारा बांधणे, अशा अनावधानाने घडणाऱ्या चुकांमुळे होणाऱ्या अपघातांची विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना सतर्कतेचे उपाय समजावून सांगण्यात आले.

---

### न्यू भारत गणेश मंडळाच्या वतीने

# रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*



**शेंदूरजनाघाट** – प्रभात चौक येथील न्यू भारत गणेश मंडळ व मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष आरोग्य अभियान अंतर्गत खेरडे बाल रुग्णालय वरुड व वरुड ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिराचे उदघाटन ठाणेदार राहुल गवई, डॉ.खेरडे, मनोज होले, हर्षल होले, जयप्रकाश भोंडेकर, मंगेश चोपडे यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन व दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मोफत आयुष्यमान कार्ड काढून देण्यात आले तसेच १८ वर्ष खालील बालकांची तपासणी व त्यांना मोफत औषध वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिराचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना यावेळी हेल्मेटचे वाटप सुद्धा करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता पियुष सिनकर, अक्षय पाटील, अंकुश थेटे, भारत पाटील, अभिजीत होले, निकेश श्रीखंडे, निखिल अढाऊ, तेजस कुऱ्हाडे, प्रथमेश होले, निकेश पाटील या कार्यकर्त्यांनी व खेरडे हॉस्पीटलच्या टीमने अथक परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८०/२०२६** **ने.ता.१९/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती दिक्षा आशिष पाटील, वय अं.२९ वर्ष, धंदा-घरकाम

२) कनिष्का आशिष पाटील, वय अं.८ वर्ष, धंदा- शिक्षण

३) प्रज्ञेष आशिष पाटील, वय अं.६ वर्ष, धंदा- शिक्षण

४) कांता रमेश पाटील, वय अं.५८ वर्ष, धंदा- घरकाम

सर्व रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती

(अर्जदार क्र.२ व ३ करीता अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.१ आई)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत आशिष रमेशराव पाटील, रा.सावंगी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७७८/२०२६** **ने.ता.१६/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती व्दारकाबाई काशिराम सिरसाम, वय ६८ वर्ष,धंदा-घरकाम

२) किशोर काशिराम सिरसाम, वय अं.४२ वर्ष, धंदा-मजुरी

३) ईश्वर काशिराम सिरसाम, वय अं.३८ वर्ष, धंदा- मजुरी

क्र.१ ते ३ रा.झोलंबा, ता.वरुड, जि.अमरावती

४) शुभांगी वामनराव मरस्कोल्हे, वय अं.४० वर्ष, धंदा- घरकाम

रा.पांढरघाटी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत काशिरामजी भादु सिरसाम, रा.झोलंबा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## वरुड तालुक्यातील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – येथील सचिन पोहरकर यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – गौरव क्षिरसागर यांचे कडील महालक्ष्मी दर्शन




**टेंभुरखेडा** – येथील पंकज बाबाराव कराळे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन




**पवनी (स.)** – ददगाळे बंधू यांचे कडील महालक्ष्मी दर्शन




**लोणी** – येथील गाडवे परिवाराच्या श्री महालक्ष्मी मातेच्या दर्शनाला १५० वर्षे पूर्ण झाले.

# मुकुटबन-गडचांदूर रेल्वेमार्गासाठी ४९३ कोटींची मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**छत्रपती संभाजीनगर** – मराठवाडा आणि विदर्भातील मालवाहतूक नेटवर्कला बळकटी देणाऱ्या मुकुटबन ते गडचांदूर या ३८.२१ किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वेमार्गाच्या बांधकामाला भारतीय रेल्वेने ४९३ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या मार्गामुळे छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील प्रमुख औद्योगिक आणि व्यापारी केंद्रांना कोळसा, सिमेंट तसेच अन्य मालाची वाहतूक अधिक थेट आणि कार्यक्षम पद्धतीने करता येणार आहे. दक्षिण मध्य रेल्वेअंतर्गत येणाऱ्या या प्रकल्पामुळे यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन आणि चंद्रपूर जिल्ह्यातील गडचांदूर या औद्योगिक आणि खाण क्षेत्रांना मजबूत रेल्वे कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. या परिसरात सिमेंट प्रकल्प, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या कोळसा खाणी तसेच चुनखडीच्या खाणी मोठ्या प्रमाणात आहेत. नवीन रेल्वेमार्गामुळे गर्दीच्या बल्हारशाह-नागपूर उच्च घनता रेल्वे मार्गावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांतील तुलनेने कमी रेल्वे कनेक्टिव्हिटी असलेल्या भागांना या प्रकल्पाचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील मालवाहतुकीचे नेटवर्क अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे.



वरुड – शहरातील मोठा मारुती जवळील रहिवाशी हर्षल गुल्हाने यांच्या कडील महालक्ष्मी दर्शन.

# मध्य रेल्वेवर दररोज ११ हजारांहून अधिक विनातिकीट प्रवासी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांविरोधात मध्य रेल्वेने कारवाई तीव्र केली आहे. किमान दंडाच्या रकमेत झालेली वाढ, तिकीट तपासणीच्या मोहिमांमुळे २०२६-२७ मध्ये प्रशासनाला दंडात्मक महसूल प्राप्त झाला आहे. यातून मध्य रेल्वेवर दररोज ११ हजाराहून अधिक प्रवासी विनातिकीट प्रवास करत असल्याचे समोर आले आहे. मध्य रेल्वेने एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत कारवाई केली. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट किंवा अयोग्य/अवैध प्रवास करणाऱ्या १८ लाख ३ हजार प्रवाशांना पकडले. त्यांच्याकडून १४० कोटी ८१ लाख रुपयांचा दंड वसूल केला. गेल्या वर्षी तुलनेत या वर्षीच्या प्रकरणांच्या संख्येत ५ टक्के, उत्पन्नात ४० टक्के वाढ झाली आहे.

## महात्मा फुले इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेत

# मातीपासून गणेशमुर्ती बनवणे स्पर्धा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – महात्मा फुले इंग्रजी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेत मातीपासून गणेशमुर्ती बनवणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये शाळेतील वर्ग १ली ते ४ थीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. नगरपरिषद शेंदुरजनाघाट द्वारे आयोजित पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी



शाडूची माती, नैसर्गिक माती पर्यावरण पूरक साहित्याचा वापर करुन सुंदर अशा गणेशमुर्ती बनवून आणले होती. प्लास्टर ऑफ पॅरीसचा वापर टाळावा, पर्यावरणास हानिकारक साहित्याचा वापर करु नये, जल प्रदूषण टाळावे, हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. विद्यार्थ्यांनी बनवून आणलेल्या गणेशमूर्तीचे परीक्षण करुन प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमाक आणि प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता मुख्याध्यापिका अर्चना मोघे उपस्थित होत्या तसेच शिक्षिका शुभांगी पांडे, मेघा मोरे, प्रियंका कोडापे, अश्विनी रडके, करुणा निंबुळकर, मंजुषा अकर्ते, करिष्मा पोहरकर, पूजा मेंढे यांचेसह कर्मचारी वनिता वानखडे, माधुरी सुपले, वैभव सावरकर उपस्थित होते.

## तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत

# एनटीआर हायस्कूलची उन्नती भोकरे प्रथम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक क्रीडा विभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत एन.टी.आर.हायस्कूलची विद्यार्थिनी उन्नती छत्रपती भोकरे हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

या घवघवीत यशामुळे तिने शाळेच्या नावलौकिकात भर घातली असून तिच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बुद्धिबळ स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या अंतिम सामन्यात उन्नतीने आपल्या चाणाक्ष आणि कौशल्याने प्रतिस्पर्ध्याला मात देत हे विजेतपद मिळवले. विशेष म्हणजे, उन्नतीने सलग तीन वर्षांपासून या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावुन आपले वर्चस्व कायम राखण्याची अभूतपूर्व कामगिरी केली आहे. तिच्या या यशाबद्दल नवयुवक शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक योगेश बरडिया, पर्यवेक्षक शशांक पाचघरे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालकांनी तिचे अभिनंदन केले आहे.




## आनंद कौशल्यान बुद्ध विहार मलकापूर येथे

# यशवंतराव आंबेडकर यांचा स्मृतिदिन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – भारतीय बौद्ध महासभा महिला शाखा येथे आनंद कौशल्यान बुद्ध विहार मलकापूर येथे चैत्यभूमीचे शिल्पकार तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुत्र भैयासाहेब उर्फ यशवंतराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभाचे गोपाल पाटील तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन संस्कार विभाग जिल्हा अमरावती पूर्व उपाध्यक्ष विलासराव आठवले होते. प्रमुख अतिथी म्हणुन सेवानिवृत्त शिक्षिका रंजना पाटील व सेवानिवृत्त वायरमन रमेश कुसळे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने भंते अनागरिक धम्मपाल व पेरियार रामास्वामी यांच्या जयंतीनिमित्त सुद्धा त्यांच्या जीवनावर याप्रसंगी प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन रमाई वाचनालयचे व्यवस्थापक संदेश डोंगरे, प्रास्ताविक रंजना पाटील तर आभार महिला सरचिटणीस यांनी मानले. या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात बौद्ध उपासक आणि उपासिका उपस्थित होत्या.




## वरुड शहर व तालुक्यातील गणेश दर्शन

०१



वरुड – नवयुवक बालमित्र गणेश मंडळ खारीपुरा येथील मनमोहक गणेश मुर्ती

०२



वरुड – येथील जवाहर चौकातील बाल गोपाल गणेश मंडळाची मनमोहक गणेश मुर्ती

०३



टेंभुरखेडा – आनंद गणेश मित्र मंडळ येथील मनमोहक गणेश मुर्ती

०४



वरुड – शहरातील सावता चौक परिसरातील निर्भय नगरातील निर्भय गणेश मंडळाची मनमोहक गणेश मुर्ती

०५



आमनेर – श्री सांस्कृतिक गणेश उत्सव मंडळाची मनमोहक गणेश मुर्ती


## वरुड तालुक्यातील महालक्ष्मी दर्शन

०१



चांदस वाठोडा – येथील मनिषा मंगेश ठाकरे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन

०२



राजुरा बाजार – येथील रहिवासी गणेश खंडाईतकर यांच्याकडील महालक्ष्मी दर्शन

०३



अमरावती – येथील साईनगर परिसरातील प्रफुल्ल कॉलनीतील रविंद्र शिखरे, आनंद शिखरे यांचेकडील महालक्ष्मी दर्शन





# चौपाटी, विसर्जनस्थळी चोख व्यवस्थापन : देशभरातील तज्ज्ञांकडून पालिका, पोलिसांचे कौतुक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** –मुंबई : स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी) येथे श्रीगणेशमूर्ती विसर्जनासाठी विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. येथे येणाऱ्या लाखो भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन, सोयी-सुविधा आणि श्रीगणेशमूर्ती विसर्जनाबाबत केलेल्या विविध उपाययोजनांची



देशभरातील १३ वरिष्ठ वरिष्ठ महसुली अधिकारी (आयआरएस) आणि तज्ज्ञांच्या अभ्यास पथकाने पाहणी केली. सार्वजनिक धोरण व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक कार्यक्रमांचे नियोजन, नागरी प्रशासन व अंमलबजावणी याविषयी माहिती मिळावी, या उद्देशाने भारतीय व्यवस्थापन संस्था मुंबई यांच्याकडून याचे आयोजन करण्यात आले होते. अशी केली जाते व्यवस्था मुंबईत सर्वाधिक श्रीगणेशमूर्ती विसर्जन हे स्वराज्यभूमी येथे होते. श्रीगणेश मूर्ती विसर्जनासाठी येथे २० मनोरे, १२ कृत्रिम तलाव, ९० प्रसाधनगृहे, २२ तराफे, ११९४ जर्मन/स्टील प्लेट, २२ निर्माल्य कलश, एक प्राथमिक आरोग्य केंद्र, ५४८फ्लड लाईट, ११ सर्च लाईट, ३ रुग्णवाहिका आणि १ हजार मनुष्यबळ बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सज्ज ठेवण्यात आले आहेत.

# लोहगडावर दरीत ढकलताना पाहणारे 'ते' 3 प्रत्यक्षदर्शी समोर!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – केतन अग्रवाल हत्या प्रकरणात लोणावळा ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात दाखल केलेल्या चार्जशीटमधून अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिया गोयल आणि चेतन चौधरी यांनी केतनला लोहगडाच्या दरीत ढकलल्याचे तीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पोलिसांच्या हाती लागले आहेत.

हे तिन्ही साक्षीदार न्यायालयात आरोपींविरोधात साक्ष देण्यास तयार असल्याने या



खटल्याला अत्यंत महत्त्वाचे वळण मिळाले आहे. तपासात असे समोर आले आहे की, मार्च २०२६ पासूनच केतनला रस्त्यातून हटवण्याचा कट रचला जात होता.

सुरुवातीला आरोपींनी परराज्यातील एका व्यक्तीला सुपारी देऊन केतनला अपंग करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र पकडले जाण्याच्या भीतीने त्यांनी स्वतःच त्याचा खून करण्याचा निर्णय घेतला.

# बार्सिलोनामध्ये 'गणपती बाप्पा मोरया'

## महाराष्ट्र मंडळ स्पेनतर्फे गणेशोत्सव, स्पॅनिश कलाकारांचाही सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**बदलापूर** – सातासमुद्रापार राहूनही आपली संस्कृती आणि परंपरा जपणाऱ्या स्पेनमधील महाराष्ट्रीय बांधवांनी एकत्र येत बार्सिलोना शहरात यंदाचा गणेशोत्सव उत्साहात साजरा केला. महाराष्ट्र मंडळ स्पेनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या एकदिवसीय गणेशोत्सवाचे हे सलग चौथे वर्ष होते. परदेशातही मराठमोळ्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा झाल्याने भारतीय समुदायामध्ये उत्साहाचे वातावरण होते.



या सोहळ्याला बार्सिलोना येथील भारताचे महावाणिज्यदूत इंबसेकर सुंदरमूर्ती, कॉन्सुल सुदीप्त रॉय, त्यांच्या कार्यालयातील अधिकारी तसेच बार्सिलोनामध्ये वास्तव्यास असलेला मोठा भारतीय समुदाय उपस्थित होता. गणेशमूर्तीच्या स्थापनेनंतर उपस्थित गणेशभक्तांनी एकत्र येत श्री गणपती अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण केले. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाची रंगत वाढवली. लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत विविध वयोगटांतील कलाकारांनी आपल्या कलाविष्कारातून उपस्थितांची मने जिंकली.

# रशियाच्या स्टेट ड्युमाच्या निवडणुकीत मीरा-भाईंदरचा ठसा



(प्रतिनीधी वरुड दर्पण)


**मॉस्को/भाईंदर** – रशियात १८ ते २० सप्टेंबरदरम्यान पार पडलेल्या २०२६च्या स्टेट ड्युमा निवडणुकीत भारताचे ॲड. रवी व्यास यांनी आंतरराष्ट्रीय निवडणूक निरीक्षक म्हणून सहभाग घेतला. मीरा-भाईंदर महापालिकेचे सभागृह नेते आणि वकील म्हणून कार्यरत असलेल्या व्यास यांनी मॉस्कोतील निवडणूक प्रक्रियेचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. रशियाच्या ४५० सदस्यांच्या स्टेट ड्युमासाठी ही निवडणूक झाली. व्यास यांनी मॉस्को शहरातील ३० हून अधिक मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान केंद्रांवरील प्रशासकीय व्यवस्था, मतदारांची ओळख पडताळणी, मतदानाची गोपनीयता आणि सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. तसेच केंद्रीय मॉनिटरिंग व निगराणी कक्षाला भेट देऊन इलेक्ट्रॉनिक आणि रिमोट डिजिटल मतदान प्रणालीची कार्यपद्धती, सुरक्षितता व डेटा संरक्षणाबाबत माहिती घेतली.

# मुंबईतील बंद कबुतरखाने तात्काळ उघडा

## जैन मुनी निलेशचंद्र महाराजांचा अल्टीमेटम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईतील बंद करण्यात आलेले सर्व कबुतरखाने तात्काळ सुरू करण्यात यावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा जैन मुनी निलेशचंद्र महाराज यांनी दिला आहे. काही महिन्यांपूर्वी आरोग्याच्या कारणास्तव आणि नागरिकांच्या तक्रारींमुळे मुंबईतील विविध भागांतील कबुतरखाने बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यावरून मोठा राजकीय व सामाजिक वाद रंगला




होता. आता पुन्हा एकदा हा प्रश्न ऐरणीवर आला असून, मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात मुनी निलेशचंद्र महाराज यांनी सरकारला घरचाआहेर देत आक्रमक भूमिका घेतली आहे. याप्रकरणी बोलताना त्यांनी राज्य सरकारवर आणि विशेषतः मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनादरम्यान जैन समाजाला कबुतरांच्या प्रश्नी न्याय मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र अद्यापही पायधुनी येथील गोडीजी पार्श्वनाथ जैन मंदिरासह शहरातील सर्व कबुतरखान्यांमधील दाणा-पाणी बंद आहे. मंत्री मंगलप्रभात लोढा हे जाणीवपूर्वक जैन समाजाचा आवाज दाबण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. येत्या काळात हे कबुतरखाने पूर्ववत सुरू न झाल्यास गोडीजी मंदिरासमोर भव्य आंदोलन आणि आमरण उपोषण केले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. या संपूर्ण प्रकरणाची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून दिली जाणार असून, त्यानंतरही ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असे मुनी निलेशचंद्र महाराज यांनी स्पष्ट केले आहे.

# इटलीच्या शाळांमध्ये बुरखा-नकाबवर बंदी येणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***इटली*** – युरोपियन देशात बुरख्यावर बंदी घालण्यासाठी कठोर पावलं उचलली जात आहेत. फ्रान्स, ऑस्ट्रिया आणि बेल्जियमनंतर आता इटलीतही बुरखा आणि नकाबवर बंदी घालण्याची तयारी सुरू झाली आहे.

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी या विषयात हात घालत याबाबतची महत्त्वाची घोषणा केली आहे. मेलोनी यांनी आपल्या पक्षाच्या कार्यक्रमात स्पष्ट केलं की, सरकारी शाळांमध्ये चेहरा झाकण्यावर बंदी घालावी. इतकंच काय तर सरकारी शाळांमध्ये विदेशी



विद्यार्थ्यांची संख्याही मर्यादीत ठेवण्यावर जोर दिला. इटलीत सर्वाधिक स्थलांतरित येत असतात.

विशेष म्हणजे मुस्लिमबहुल देशातून येणाऱ्या लोकांमुळे इटलीचं राजकारण आणि सार्वजनिक जीवनावर सर्वाधिक प्रभाव पडत असल्याचं दिसत आहे. त्यामुळे इटली सरकारने धोरणात्मक पावलं उचलण्याची तयारी केली आहे.





